# Maharashtra Information Technology Support Center
# महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

MITSC/OUT/MAY 2025/M/ 251 दि.14/05/2025

**प्रति,**
**मा. कुलसचिव,**
**गोंडवाना विद्यापीठ,**
**गडचिरोली**

**विषय : करिअर कट्टा अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेच्या आयोजनाबाबत...**

मा. महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून आपणास विनंती की, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने **शुक्रवार दिनांक १६ मे २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** येथे **'करिअर कट्टा'** उपक्रमांतर्गत **'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि NAAC करिता आवश्यक असणारा सामंजस्य करार करणे'** या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये **राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि नॅक मूल्यांकनासाठी आवश्यक असणाऱ्या सामंजस्य करारांवर (MOU) महत्त्वपूर्ण मार्गदर्शन** केले जाणार आहे.
आपल्या विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य आणि समन्वयक, विभाग प्रमुख आणि संबंधित अधिकाऱ्यांसाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरेल अशी आशा आहे. या कार्यशाळेसाठी सभागृह उपलब्ध व्हावे तसेच याबाबत महाविद्यालयांना अवगत करून सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,
आपला विश्वासू,

**यशवंत शितोळे**
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान
सहाय्यता केंद्र


**Yashwant Shitole**
*Founder President*
**+91 73044 29777**

Mahila Bank Basement,
Khasbag Maidan, Kolhapur-416 012
0231-2993950
www.mitsc.co.in
uvajagar@gmail.com